# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२११२८
२५६२११२९
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निववि/२८७ दिनांक : ०५/०९/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'क्रीडा साहित्य खरेदी' या उपक्रमाअंतर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत..**
**संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. साफुपुवि/निववि/२७१, दिनांक १९/०८/२०२२**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२२—२३ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'क्रीडा साहित्य खरेदी' या उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी शनिवार, दि. २० ऑगस्ट, २०२२ ते सोमवार दि. ५ सप्टेंबर, २०२२ असा निश्चित करण्यात आला होता.

या पत्रान्वये सदर प्रस्ताव सादर करण्यास मंगळवार दि. १३ सप्टेंबर, २०२२ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली असून ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची छापील प्रत व त्यासोबत मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून गुरुवार दि. १५ सप्टेंबर, २०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी. मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व संलंग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना बंधनकारक राहतील.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —
**unipune.ac.in --Home page – BOD Online – Login – For College Users – College Login & Password – Planning and Development**

महाविद्यालये/परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या प्रस्तावाची छापील प्रत आवश्यक कागदपत्रांसहीत विहीत मुदतीत नियोजन व विकास विभागामध्ये जमा न केल्यास तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपली विश्वासू,

5/9/22

(डॉ. वैशाली साकोरे)
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)